# बृहन्मुंबई महानगरपालिका

# परिपत्रक

# 2023-24

क्र.साप्रवि/एफजीआर/12 दि.11.10.2023

विषय : परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व असमर्थ सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला असमर्थता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच महानगरपालिका सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती उपदान मंजूर करणेबाबत.

संदर्भ : 1) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-1005/126/सेवा-4 दि.31.10.2005

2) परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/10 दि.04.07.2008

3) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-2017/प्र.क्र.29/सेवा-4 दि.29.09.2018

4) परिपत्रक क्र.प्र.ले.(को.)/एफ.डी.सी.पी.एस./28 दि.13.10.2020

5) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दि.31.03.2023

6) वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दि.20.04.2023

7) प्रशासक (स्थायी समिती) ठराव क्र.1024 दि.31.08.2023

8) प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्र.635 दि.15.09.2023

राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर दि.01.11.2005 रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी येथील शासन निर्णय क्र.अंनियो-1005/126/सेवा-4 दि.31.10.2005 अन्वये सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजनेऐवजी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' लागु केली आहे. राज्य शासनाच्या धर्तीवर विधि समिति ठराव क्र.143, दि.25.02.2008, स्थायी समिति ठराव क्र.1535, दि.26.03.2008 व महानगरपालिकेचा ठराव क्र.111, दि.05.05.2008 अन्वये दि.05.05.2008 रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना महानगरपालिकेने नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. परंतु, सदर कर्मचा-यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम,1953 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू नाही.

2. मुंबई महानगरपालिकेचे निवृत्ती वेतन विषयक नियम सर्वसाधारणपणे राज्य शासनाच्या निवृत्तीवेतन नियमावर आधारीत असतात. सद्यस्थितीत राज्य शासनाने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचा-यांसाठी निवृत्ती वेतन विषयक लाभ देण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दि.31.03.2023 अन्वये सुधारीत निर्देश निर्गमित केलेले आहेत. राज्य शासनाच्या उपरोक्त नमूद शासन निर्णयाच्या धर्तीवर सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासक (स्थायी समिती) ठराव क्र.1024 दि.31.08.2023 व प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्र.635 दि.15.09.2023 अन्वये मंजूरी प्राप्त झालेली असून याबाबत पुढीलप्रमाणे सूचना प्रसृत करण्यात येत आहे :-

1) दि.05.05.2008 रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचा-याचा,

(अ) सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान,

(ब) असमर्थ सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला असमर्थता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान लागू करण्यात येत आहे.

त्यानुसार सदर कुटुंब निवृत्तीवेतनधारकास व असमर्थ निवृत्तीवेतनधारकास मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 मधील तरतुदीप्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतन / असमर्थता निवृत्तीवेतन लागू होईल

(क) तसेच महानगरपालिका सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती उपदान लागू करण्यात येत आहे.

(ड) सद्यस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील उपरोक्त कर्मचा-यांना मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी या योजनेचा लाभ देण्यात येत नाही. परंतु उपरोक्त शासन निर्णयाच्या धर्तीवर उपरोक्त कर्मचा-यांना मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 नुसार मृत्यू-नि-सेवा-उपदान (DCRG) किंवा उपदान अधिदान अधिनियम, 1972 नुसार अनुज्ञेय असलेले उपदान यापैकी जे जास्त असेल ते उपदान महानगरपालिका कर्मचा-यांना देय होईल.

म्हणजेच उपरोक्त शासन निर्णयानुसार कर्मचा-यास,

I) सेवेत असताना मृत्यू झाल्यास – कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान

II) असमर्थ सेवानिवृत्त झाल्यास - असमर्थता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान

III) महानगरपालिका सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना – सेवानिवृत्ती उपदान

या प्रयोजनार्थ सद्यःस्थितीत मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 मधील तरतुदी लागू राहतील

2) दि.01.11.2005 रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा कर्मचारी, 10 वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना मृत्यू पावल्यास, त्याचे नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देशन केले नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान रु.10 लक्ष देण्याबाबत राज्य शासनाच्या शासन निर्णय क्र.अंनियो-2017/प्र.क्र.29/सेवा-4, दि.29.09.2018 च्या धर्तीवर महानगरपालिकेत दि.05.05.2008 रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना सदर लाभ देण्याबाबत विधि समिति / स्थायी समिति / महानगरपालिका यांची अनुक्रमे, दि.08.11.2019 चा ठराव क्र.96, दि.18.11.2019 चा ठराव क्र.1234 व दि.09.12.2019 चा ठराव क्र.1234 अन्वये मान्यता प्राप्त करून, परिपत्रक क्र.प्रले(को.)/एफ.डी.सी.पी.एस./28 दि.13.10.2020 नुसार लागू करण्यात आलेली सानुग्रह अनुदान योजना शासन निर्णय क्र.रानियो-2022/प्र.क्र.34/सेवा-4 दि.31.03.2023 च्या दिनांकापासून म्हणजेच दि.31.03.2023 पासून बंद करण्यात येत आहे. सबब, सानुग्रह अनुदानासाठी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच प्रलंबित प्रकरणे बंद करण्यात येतील.

3) दि.05.05.2008 ते सदर परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत मृत्यू पावलेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबास मृत्यू उपदान, कुटुंब निवृत्तीवेतनाची थकबाकी तसेच नियमित कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्यासाठी सोबतचा नमुना-3 मधील विकल्प खाते प्रमुखाकडे सादर करावा लागेल. त्यानुसार कुटुंब निवृत्तीवेतनधारकास त्याला मिळालेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंतर्गत महानगरपालिकेच्या अंशदानाची रक्कम, त्यावरील व्याज आणि लाभांशासह रक्कम समायोजित करण्याच्या अटीवर कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ अनुज्ञेय होईल. सदर रक्कम समायोजित झाल्यानंतर कुटुंब निवृत्तीवेतनधारकास नियमितपणे कुटुंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहील.

4) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या व यापुढे महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा कर्मचारी यांनी त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास किंवा असमर्थता सेवानिवृत्त झाल्यास, मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 प्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतन किंवा असमर्थता निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्याबाबत अनुक्रमे, कुटुंबास किंवा स्वतः कर्मचा-यास मिळण्याबाबतचा सोबतचा नमुना-2 मध्ये विकल्प खाते प्रमुखाकडे सादर करावा.

5) जे महानगरपालिका कर्मचारी मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 प्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतन किंवा असमर्थता निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्याबाबतचा विकल्प सादर करतील, त्यांनी सोबतचा नमुना-1 प्रमाणे कुटुंबाचा तपशिल सादर करणे अनिवार्य राहील.

6) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या सर्व कर्मचा-यांनी परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वरील परिच्छेद क्र.2 मधील अ.क्र.4) प्रमाणे विकल्प देणे बंधनकारक राहील. तसेच यापुढे महानगरपालिका सेवेत नियुक्त होणा-या कर्मचा-यानी उपरोक्तप्रमाणे विकल्प महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त झाल्यावर 8 दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

7) राज्य शासन उपरोक्त विषयाबाबतच्या शासन निर्णयात वेळोवेळी ज्या सुधारणा करील त्याच धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे कार्यपध्दती बाबतच्या सविस्तर सूचना प्रसृत करण्यात येतील.

सर्व खाते प्रमुख, अधिष्ठाता, रुग्णालये व सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे कि, त्यांनी अखत्यारितील आस्थापना कर्मचा-यांना वरील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यास सुचित करावे.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या Intranet वर ftp://hr.mcgm.gov.in/ Circular/GAD/ Dy.C.A. (Estt.)/FGR या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/- दि.20.09.2023
श्रीम.वैशाली देसाई
उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)

सही/- दि.21.09.2023
श्रीम.सुलोचना कवडे
प्रमुख लेखापाल (कोषागार)

सही/- दि.22.09.2023
श्री. पांडुरंग गोसावी
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

सही/- दि.25.09.2023
श्री.प्रशांत गायकवाड
उप आयुक्त (वित्त) प्र.

सही/- दि.25.09.2023
श्री. मिलिन सावंत
सह आयुक्त (सा.प्र.)

सही/- दि.27.09.2023
डॉ.अश्विनी जोशी
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही/- दि.03.10.2023
श्री. पी. वेलरासू
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)

सही/- दि.09.10.2023
डॉ.इ सिं चहल
मान.महानगरपालिका आयुक्त

## परिपत्रक

## 2023-24

क्र.साप्रवि/एफजीआर/12 दि.11.10.2023

प्रत --------------------------------------------- यांना (-------------- ज्यादा प्रतींसह) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

11.10.2023

उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) यांजकरिता

## नमुना 1

## कुटुंबाचा तपशील

मनपा कर्मचा-याचे नाव :

पदनाम :

जन्म तारीख :

नियुक्तीचा दिनांक :

दि. / / 20 रोजी माझ्या कुटुंबात* असलेल्या सदस्यांचा तपशील

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्याचे नाव* | जन्मतारीख | महानगरपालिका कर्मचा-याशी असलेले नाते | खाते प्रमुखाची सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |

वरील तपशिलात कोणतीही भर पडल्यास किंवा फेरबदल झाल्यास त्यासंबंधीची माहिती कार्यालय प्रमुखास / लेखापरीक्षा अधिका-यास कळवून हा तपशील अद्यावत ठेवण्याची मी याद्वारे हमी घेतो.

ठिकाण :

दिनांक :

कर्मचा-याची सही

*या प्रयोजनासाठी "कुटुंब" याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 मधील नियम क्र.88(4) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले "कुटुंब" असा होतो.

## नमुना-2

### सेवेत असताना महानगरपालिका कर्मचारी विकलांगतेमुळे महानगरपालिका सेवेकरिता असमर्थ ठरल्यास / मृत्यू पावल्यास त्याला अनुज्ञेय लाभ मिळण्याबाबतचा विकल्प

मी, ........................................ याद्वारे विकल्प देत आहे की, महानगरपालिका सेवेत असताना विकलांगतेमुळे महानगरपालिकेच्या सेवेकरिता असमर्थ ठरल्यास / मृत्यू पावल्यास मला / माझ्या कुटुंबास मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 अनुसार लाभ देण्यात यावेत.

कर्मचा-याची स्वाक्षरी
नाव
पदनाम
कार्यालयाचे नाव व पत्ता

ठिकाण :

दिनांक :

हा विकल्प दिल्यामुळे यापूर्वी दिलेला विकल्प रद्द समजण्यात यावा.

---

कार्यालय प्रमुख यांनी भरावे.

विकल्प प्राप्त झाल्याचा दिनांक :

याबाबतचा नोंद सेवापुस्तकामधील पृ.क्र.        वर घेण्यात आली आहे.

खाते प्रमुखाची सही व शिक्का

विकल्प स्विकारल्याची प्रत संबंधित कर्मचा-यास देण्यात यावी.

## नमुना-3

## परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचा-यांना दि.05.05.2008 ते आजपर्यंतच्या कालावधीत असमर्थता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनी / मृत्यू झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांनी द्यावयाचा विकल्प

मी, ........................................ याद्वारे विकल्प देत आहे की, मला मुंबई महानगरपालिका (निवृत्तीवेतन) नियम, 1953 अंतर्गत लाभ देण्यात यावे. सदर लाभ अनुज्ञेय करताना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंतर्गत देण्यात आलेले लाभ समायोजित करण्यात यावे.

असमर्थता निवृत्त झालेल्या कर्मचा-याची स्वाक्षरी /
कुटुंब निवृत्तवेतनधारकाची स्वाक्षरी